नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २०३ | Issue - 203 | वार मंगळवार दि. १० डिसेंबर २०२४ | Blow- Tuesday Date 10 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## कर्नाटक सरकारचा दडपशाहीचा प्रयत्न

### बेळगावमध्ये मराठी भाषिकांचा मेळावा; कर्नाटक सरकारचा विरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमा प्रश्न पुन्हा एकदा चिघळण्याची शक्यता आहे. कारण बेळगावमध्ये मराठी भाषिकांचा मेळावा महाराष्ट्र एकीकरण समितीकडून आयोजित करण्यात आला होता. मात्र, या मेळाव्यास कर्नाटक सरकारने विरोध केला. त्यावरून पुन्हा एकदा महाराष्ट्र विरुद्ध कर्नाटक असा संघर्ष तापला आहे. याचे पडसाद महाराष्ट्र विधानसभेच्या विशेष अधिवेशनात देखील पाहायला मिळाले. तसेच यावरून विरोधकांनी राज्य सरकारला देखील घेरलं. तसेच शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या सर्व आमदारांनी आज विधानसभेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला.

तसेच बेळगावमधील मराठी भाषिकांवर होत असलेल्या अन्यायाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. यावरून आता राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया देत महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमाप्रश्न जिव्हाळ्याचा विषय असून महाराष्ट्र सरकार बेळगावमधील मराठी भाषिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचं सांगत कर्नाटक सरकारच्या दडपशाहीचा निषेध असल्याचं म्हणत उपमुख्यमंत्री शिंदेंनी कर्नाटक सरकारला सुनावलं आहे.

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी सुनावले**

बेळगावमध्ये मराठी भाषिकांबद्दल आणि कर्नाटक-महाराष्ट्र सिमा प्रश्न जो आहे? याबाबत शिवसेनेची भूमिका ही बेळगावमधील मराठी भाषिकांबाबतची राहिलेली आहे. मराठी भाषिकांच्या पाठिमागे शिवसेना खंबीर उभी आहे.



तसेच बेळगावबाबत माझी भूमिका देखील जिव्हाळ्याची आहे. कारण १९८६ साली जे आंदोलन झालं. त्या आंदोलनामध्ये मी देखील बेळगावच्या तुरुंगात होतो. तसेच मी जेव्हा मुख्यमंत्री होतो तेव्हा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री अशी संयुक्त बैठक घेतली होती. तसेच कर्नाटक-महाराष्ट्र सिमा प्रश्न हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्यामुळे मराठी भाषिकांवर कोणताही अन्याय होणार नाही, अशी भूमिका कर्नाटक सरकारने घ्यावी, अशा सूचना तेव्हा अमित शाह यांनी दिल्या होत्या, असं उपमुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं.

मराठी भाषिकांचा मेळावा हा महाराष्ट्र एकीकरण समितीने आयोजित केला होता. मात्र, तो मेळावा होऊ नये म्हणून पुरेपूर प्रयत्न कर्नाटक सरकारने केला. एक दडपशाही करण्याचा प्रयत्न कर्नाटक सरकारने केला. जे आंदोलनकर्ते होते ते माजी आमदार किंवा माजी महापौर असतील त्यांच्यासह शेकडो मराठी भाषिकांना तुरुंगात डांबण्याचा प्रयत्न कर्नाटक सरकारने केला. त्यामुळे याचा मी निषेध करतो. महाराष्ट्र सरकारची भूमिका एकच आहे की बेळगाव मधील मराठी भाषिकांच्या पाठीशी महाराष्ट्रातील जनता खंबीरपणे उभी आहे,असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं.

## संजय मल्होत्रा आरबीआयचे नवे गव्हर्नर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी संजय मल्होत्रा यांची निवड करण्यात आली आहे. ११ डिसेंबर पासून पुढील तीन वर्षांसाठी त्यांचा कार्यकाळ असणार आहे. कॅबिनेटच्या समितीने त्यांची महसूल सचिव पदी असलेल्या संजय मल्होत्रा यांची निवड रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी केली आहे. छख या वृत्तसंस्थेने हे वृत्त दिलं आहे. सध्याचे रिझर्व्ह बँकेचे गवर्नर शक्तिकांत दास यांचा कार्यकाळ उद्या, १० डिसेंबर रोजी संपत आहे. संजय मल्होत्रा हे १९९० च्या राजस्थान कॅडरचे खड अधिकारी आहेत. नोव्हेंबर २०२० मध्ये ते आरईसीचे चेअरमन आणि एमडी या पदावर नियुक्त झाले. त्याआधी ते उर्जा मंत्रालयात अतिरिक्त सचिव पदावर कार्यरत होते. २०२२ मध्ये डिपार्टमेंट ऑफ फायनान्शियल सर्व्हिसेसचे सचिव या पदावर ते कार्यरत होते. संजय मल्होत्रा यांना केंद्र सरकारने रिझर्व्ह बँकेच्या संचालक पदीही नियुक्त केलं होतं. आता त्यांना आरबीआयचे गव्हर्नर हे पद देण्यात आलं आहे. पुढील तीन वर्षांसाठी त्यांचा कार्यकाळ असणार आहे. संजय मल्होत्रा ११ डिसेंबरपासून स्वीकारणार पदभार संजय मल्होत्रा हे महसूल सचिव या पदावर कार्यरत आहेत. मल्होत्रा यांची आता रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी नियुक्ती झाली आहे. पुढील तीन वर्षांसाठी ते हे पद सांभाळतील. हे १९९० बॅचचे राजस्थान केडरचे खड (भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी) आहेत. त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कानपूर येथून कॉम्प्युटर सायन्समध्ये अभियांत्रिकी पदवी घेतली आहे. मल्होत्रा यांनी प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी, यूएसए येथून पब्लिक पॉलिसी या विषयात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. संजय मल्होत्रा (डरपक्षरू चरश्रर्हेाीर) हे १९९० च्या बॅचचे आणि राजस्थान केडरचे सनदी अधिकारी आहेत. त्यांनी कानपूरमधून कंप्यूटर विज्ञान मध्ये अभियांत्रिकीची पदवी मिळवली आहे. याशिवाय त्यांनी अमेरिकेतील प्रिन्स्टन विद्यापीठातून सार्वजनिक धोरणात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. संजय मल्होत्रा यांनी ऊर्जा, वित्त आणि कर, माहिती तंत्रज्ञान, खाणी इत्यादींसह विविध क्षेत्रांमध्ये काम केले आहे. सध्या ते अर्थ मंत्रालयात सचिव (महसूल) आहेत. त्यांनी भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या अंतर्गत वित्तीय सेवा विभागात सचिवपद भूषवले होते.

**पुढील तीन वर्षे असेल कार्यकाळ**

## लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता लवकरच मिळणार : मुनगुंटीवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालेलं आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली, तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. सरकार स्थापन झालं असलं तरी अद्याप मंत्रिमंडळाचा विस्तार बाकी आहे. त्यामुळे मंत्रिमंडळाचा विस्तार कधी होणार? याकडे अनेकांचं लक्ष लागलेलं आहे. खरं तर राज्यात पुन्हा एकदा महायुती सरकार येण्यासाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना महत्वाचं मानली जाते. मात्र, आता लाडक्या बहिणींच्या अर्जांची छाननी होणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता मिळणार की नाही? याबाबतही महिलांमध्ये संभ्रम आहे.

दरम्यान, आता लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून लाभार्थी महिलांना देण्यात येणाऱ्या १५०० रुपयांचा डिसेंबरचा हप्ता कधी मिळणार? यासंदर्भातील महत्वाची माहिती समोर आली आहे. भाजपाचे नेते तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी लाडकी बहीण योजनेसंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. तसेच लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता पुढील दोन ते तीन दिवसांत मिळणार असल्याचं सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितलं आहे. ते एका वृत्तवाहीनीशी बोलत होते. आता सरकार स्थापन झालेलं आहे, सरकार अतिशय चांगलं काम करत आहे. आता लवकरच मंत्रिमंडळाचा विस्तार देखील होईल. मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर लगेचच मंत्रिमंडळाची बैठक होईल. काहीही चिंता करण्याची आवश्यकता नाही. सर्व विभाग त्यांचं काम करत आहेत. चांगले निर्णय होत आहेत. आता लाडक्या बहिणींचा हप्ता देखील पुढील दोन ते तीन दिवसांत मिळणार आहे. कुठेही काहीही अडचण नाही, असं सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटलं आहे. विधानसभा निवडणूक निकालांना 'कलाटणी' देणाऱ्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेलाच सरकार कलाटणी देणार असल्याची सध्या चर्चा आहे. अडीच लाखांपेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न तसेच घरात चारचाकी वाहन असलेल्या महिलाही या योजनेचा लाभ घेत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यामुळे आता लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांच्या अर्जांची छाननी केली जाणार आहे. छाननीनंतर नियमबाह्यपणे अर्ज बाद केले जातील, अशी चर्चा आहे. मात्र, खरंच अशी छाननी होणार आहे की नाही याबाबत आदिती तटकरे यांनी माहिती दिली आहे. आदिती तटकरे म्हणाल्या, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवत असताना आम्ही ती योजना अगदी व्यवस्थितपणे राबवण्याचा प्रयत्न केला. २ कोटी ४० लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळत आहे. कोणत्याही योजनेची एवढ्या मोठ्या संख्येने छाननी केली जाणार नाही. त्यासाठी मुळात तक्रार याव्या लागतात. मी आता त्या विभागाची मंत्री नाही. तेव्हा अशा पद्धतीने तक्रार आली असेल तर माझ्याकडे त्याबद्दलची माहिती नाही. छाननी किंवा चाचणी करायची झाल्यास तक्रारीच्या आधारे करावी लागते. कोणी तक्रारी केल्या तर त्या तपासल्या जातील. मी मंत्री असताना अशा तक्रारी आल्या नव्हत्या. आत्ता आल्यात की नाही ते मला माहिती नाही. कोणीही अशा पद्धतीने तक्रार केली असेल तर विभागाचे आधिकारी निर्णय घेतात. आता तक्रारी आल्यात की नाही यासंदर्भातील मला माहिती नाही, असं आदिती तटकरे यांनी म्हटलं.

## विधानसभा अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभेचे अध्यक्ष म्हणून राहुल नार्वेकर यांची एकमुखाने निवड झाली आहे. राहुल नार्वेकर यांनी रविवारी विधानसभेच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. यावेळी राहुल नार्वेकर यांचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौतुक केलं. तसंच राहुल नार्वेकर पुन्हा येईन म्हणाले नव्हते तरीही ते पुन्हा आले असं वक्तव्य केलं. त्यामुळे उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला.

राहुल नार्वेकर यांची निवड केल्यानंतर देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज विरोधी पक्षाचेही आभार मानतो की राहुल नार्वेकर यांच्या निवडीला पूर्ण समर्थन दिलं. विरोधी पक्षातल्या सदस्यांचे आणि गटनेत्यांचे मी आभार मानतो. आपल्याकडे विधानसभा अध्यक्ष बिनविरोध निवडण्याची परंपरा आहे. ही परंपरा कायम राहिली असं देवेंद्र फडणवीस म्हणाले तसंच ते पुढे म्हणाले, अध्यक्ष महोदय आपण मी पुन्हा येईन म्हटलं नव्हतं तरीही आपण परत आलात याचा मला आनंद आहे. मला या गोष्टीचा आनंद आहे की राज्यात दोन उपमुख्यमंत्री आणि एक मुख्यमंत्री होते तेव्हा त्या तिघांमधला एक वकील होता. आता तुमच्या रुपाने आणखी वकील विधानसभेत आहे. राहुल नार्वेकर हे पहिलेच अध्यक्ष असतील पहिल्याच टर्ममध्ये ते अध्यक्ष झाले आणि त्यानंतर दुसऱ्यांदा ते अध्यक्ष झाले. नाना पटोलेंचे विशेष आभार कारण त्यांनी वाट मोकळी केल्याने ते अध्यक्ष झाले. असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. राहुल नार्वेकर यांनी विधानपरिषदेतही काम केलं. कायद्यावर भाषण करताना राहुल नार्वेकर विधानपरिषदेचे सदस्य म्हणून बारकावे शोधून काढत त्यावर बोट ठेवण्याचं काम ते करत होते. कायदेमंडळाचा अध्यक्ष आहे त्याला



कायद्याचे बारकावे माहीत असणं महत्त्वाचं आहे. मागची पाच वर्षे संक्रमणाचा काळ होता. यात ज्या घडामोडी घडल्या त्यात पहिल्यांदाच विधानसभा अध्यक्षांकडे माध्यमांचं लक्ष होतं. कदाचित सर्वाधिक चर्चेत राहिलेले राहुल नार्वेकरच होते. त्यांच्या रुपाने न्यायप्रिय आणि संयमी व्यक्तिमत्व निवडलं गेलं आहे ही आनंदाची बाब आहे असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## उमरगा तालुक्यातील केसरजवळगा येथील ३३ विद्यार्थ्यांना मळमळ, उलटीचा त्रास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील केसरजवळगा येथील महात्मा गांधी विद्यालयात आरोग्य विभागाकडून देण्यात आलेल्या रक्तवर्धक गोळ्या खाल्ल्याने तब्बल ३३ विद्यार्थ्यांना मळमळ व उलटीचा त्रास झाल्याची घटना सोमवारी (दि.९) रोजी घडली असून, सर्व विद्यार्थ्यांवर मुरुम येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहे. प्राथमिक उपचारांती सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले.आरोग्य विभागाकडून सहावी ते दहावी या वयोगटातील विद्यार्थ्यांच्या शरीरातील लोह वाढवा व रक्ताचे प्रमाण संतुलित राहावे, यासाठी सर्वच शाळात आर्यन फॉलिक ॲसिड शरीरासाठी उत्तम असलेल्या गोळ्या देण्यात येतात. याच

**रक्तवाढीच्या गोळ्या मुळे विद्यार्थ्यांना त्रास**

अनुषंगाने केसरजवळगा येथील महात्मा गांधी विद्यालयातील विद्यार्थ्यांना ९ डिसेंबर रोजी सकाळच्या सत्रात जवळपास १८० विद्यार्थ्यांना सदर गोळ्या देण्यात आल्या होत्या. यापैकी ३३ विद्यार्थ्यांना गोळ्या खाल्ल्याने मळमळ व उलटीचा त्रास जाणवल्याने



शिक्षकांनी या घटनेची माहिती आरोग्य विभागाला देत तुरंत सर्व त्रस्त विद्यार्थ्यांना मुरूम येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांकडून विद्यार्थ्यांची तपासणी करून उपचार करण्यात आल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची माहिती मिळताच उमरगा-लोहारा तालुक्याचे माजी आमदार ज्ञानराज चौगुले व जिल्हा परिषदचे माजी विरोधी पक्षनेते शरण पाटील यांनी रुग्णालयात भेट देऊन विद्यार्थ्यांची विचारपूस केली. उपचाराची डॉक्टरकडून माहिती घेतली. पालकांना न घाबरण्याचे आवाहन केले. नूतन आमदार प्रवीण स्वामी यांनी भ्रमणध्वनीवरून डॉक्टरांशी संपर्क साधून या घटनेची माहिती घेत उपचाराबाबत सतर्कता बाळगून घटनेचा लेखी अहवाल सादर करण्याची सूचना केली.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जयपूरमध्ये रायझिंग राजस्थान ग्लोबल इन्व्हेस्टमेंट समिटचे केले उद्घाटन**

**देशाच्या अर्थव्यवस्थेबद्दलही केलं मोठं वक्तव्य**


## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'मेक इन इंडिया' पाठोपाठ आता 'वेड इन इंडिया'वर भर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जयपूर : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी जयपूरमधे ९ ते ११ डिसेंबर दरम्यान होणार्या 'रायझिंग राजस्थान ग्लोबल इन्व्हेस्टमेंट समिट'चे उद्घाटन केले. या सम्मेलनाचा उद्देश राजस्थानमधील गुंतवणूक वाढीस चालणे देणे हा असून या सम्मेलनात अनेक देशांचे प्रतिनिधी आणि आंतरराष्ट्रीय संघटना देखील सहभागी झाल्या आहेत. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी उपस्थितांना संबोधित करताना 'वेड इन इंडिया' घोषणेचा राज्यातील पर्यटन वाढण्यास फायदा होईल असे मत मोदींनी व्यक्त केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मागील काही काळापासून वेड इन इंडिया संकल्पनेवर भर देताना दिसत आहेत. देशातील नामांकित जोडपी लग्न सोहळा परदेशात आयोजित करतात. त्यानंतर सरकारकडून वेड इन इंडियाचा प्रसार केला जात आहे. याअंतर्गत बाहेरच्या देशात होणारे भारतीयांचे लग्न समारंभ देशातच केले जावेत, जेणेकरून भारतीय अर्थव्यवस्थेला त्याचा फायदा होईल असे आवाहन केले जात आहे.

राजस्थानमधील पर्यटनाच्या वाढीबद्दल बोलताना पंतप्रधान मोदी यांनी याबद्दल भाष्य केले आहे. सम्मेलनात उपस्थित गुंतवणूकदारांना संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, मी देशातील नागरिकांना 'वेड इन इंडिया'चे आवाहन केले आहे. याचा फायदा निश्चित राजस्थानला होईल. राजस्थानमध्ये हेरिटेज टुरिझम, फिल्म टुरिझम, इको टुरिझम, रुरल टुरिझम, बॉर्डर एरिया टुरिझम हे वाढवण्याच्या अनेक शक्यता आहेत. या क्षेत्रांमधील



तुमची गुंतवणूक राजस्थानच्या पर्यटन क्षेत्राला बळ देईल आणि तुमचा उद्योग देखील वाढवेल.

देशाच्या अर्थव्यवस्थेसंबंधी बोलताना मोदी पुढे म्हणाले की, तुम्ही सगळे ग्लोबल सप्लाय आणि व्हॅल्यू चेनशी संबंधित अडचणी महिती आहेत. आज जगाला एका अशा अर्थव्यवस्थेची आवश्यकता आहे जी मोठ्यात मोठ्या संकटाच्या काळातदेखील मजबुतीने चालत राहिल. यासाठी भारतात व्यापक मेन्युफेक्चरिंग बेस उभारणे खूप आवश्यक आहे. हे फक्त भारतासाठी नाही तर जगाच्या अर्थव्यवस्थेसाठीदेखील महत्त्वाचे आहे.

**भारताने मॅन्युफॅक्चरिंगमध्ये आत्मनिर्भर होण्याचा संकल्प केला आहे. भारत मेक इन संकल्पनेनंतर लो कॉस्ट मेन्युफेक्चरिंग वर भर देत आहे. भारताचे पेट्रोलियम प्रोडक्ट, औषधे आणि लसी, इलेक्ट्रॉनिक साहित्य याच्या विक्रमी मॅन्युफॅक्चरिंगमुळे जगाला मोठा फायदा होत आहे. राजस्थानमधूनही गेल्या वर्षी ८४ हजार कोटींची निर्यात झाली आहे, यामद्ये इंजीनियरींग गुड्स, जेम्स अँड ज्वेलरी, टेक्सस्टाईल, हॅंडिक्राफ्ट आणि शेतीसंबंधी उत्पादनांचा वाटा देखील मोठा आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.**

भारतात उत्पादन वाढवण्यामध्ये पीएलआय योजनेचा सहभाग देखील वाढत आहे. सध्या इलेक्ट्रॉनिक्स, स्पेशालिटी स्टील, ऑटोमोबाईल्स आणि ऑटो कंपोनंट्स, सोलार पीव्हीज, फार्मासुटीकल ड्रग्ज या क्षेत्रांमध्ये उत्साह पाहायला मिळत आहे. या योजनांमुळे किमान सव्वा लाख कोटींची गुंतवणूक आली आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

## संपादकीय....

### दडपशाहीचा प्रयत्न

महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमा प्रश्न पुन्हा एकदा चिघळण्याची शक्यता आहे. कारण बेळगावमध्ये मराठी भाषिकांचा मेळावा महाराष्ट्र एकीकरण समितीकडून आयोजित करण्यात आला होता. मात्र, या मेळाव्यास कर्नाटक सरकारने विरोध केला. त्यावरून पुन्हा एकदा महाराष्ट्र विरुद्ध कर्नाटक असा संघर्ष तापला आहे. याचे पडसाद महाराष्ट्र विधानसभेच्या विशेष अधिवेशनात देखील पाहायला मिळाले. तसेच यावरून विरोधकांनी राज्य सरकारला देखील घेरलं. तसेच शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या सर्व आमदारांनी आज विधानसभेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला. तसेच बेळगावमधील मराठी भाषिकांवर होत असलेल्या अन्यायाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. मराठी भाषिकांचा मेळावा हा महाराष्ट्र एकीकरण समितीने आयोजित केला होता. मात्र, तो मेळावा होऊ नये म्हणून पुरेपूर प्रयत्न कर्नाटक सरकारने केला. एक दडपशाही करण्याचा प्रयत्न कर्नाटक सरकारने केला. जे आंदोलनकर्ते होते ते माजी आमदार किंवा माजी महापौर असतील त्यांच्यासह शेकडो मराठी भाषिकांना तुरुंगात डांबण्याचा प्रयत्न कर्नाटक सरकारने केला.

# उल्हासनगरमध्ये वंचित बहुजन युवा आघाडी वतीने स्वाक्षरी मोहीम; जनतेचा पाठिंबा







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर प्रतिनिधी/ बाळासाहेब अहिरे म लोकशाहीच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वास टिकवण्यासाठी वंचित बहुजन युवा आघाडीने ईव्हीएम विरोधात उल्हासनगरात स्वाक्षरी मोहिम राबवली आहे. विधानसभा निवडणुकीत अपेक्षित मताधिक्य मिळण्याची अपेक्षा असूनदेखील हवे तसे निकाल लागले नाहीत. यामागे ईव्हीएम मशीनमध्ये फेरफार असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. ही मोहीम लोकशाही प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी व ईव्हीएम मशीन ऐवजी पुन्हा मतपत्रिके द्वारे मतदान प्रक्रिया सुरू करण्यासाठी दबाव वाढवण्यासाठी राबवण्यात आली आहे. या मोहिमेचे नेतृत्व वंचित बहुजन युवा आघाडीचे युवा अध्यक्ष भरत रणदिवे

यांनी केले. त्यांच्या समवेत समाजसेवक संजय गुप्ता, पू. उल्हासनगर शहर अध्यक्ष शेषराव वाघमारे.पं उल्हासनगर शहर अध्यक्ष उज्वल महाले उपाध्यक्ष बाळासाहेब अहिरे प्रा . प्रविण माळवे. दलित पँथरचे ठाणे जिल्हा अध्यक्ष सुभाष उघडे. रमेश गायकवाड. शंकर गायकवाड. उल्हास ढगे.रोशन गोडबोले .रोहन गोडबोले. विनोद उघडे .भीमराव प्रधान .भरत उबाळे .यांच्यासह वंचितचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. या पदाधिकाऱ्यांनी जनतेला ईव्हीएम विरोधातील धोके समजावून सांगितले. लोकशाहीला मजबुती देण्यासाठी निवडणूक प्रक्रिया पारदर्शक राहायला हवी. ईव्हीएमच्या संशयास्पद वापरामुळे लोकशाहीवर विश्वास कमी होतो आणि ही परिस्थिती बदलण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत, असे भरत रणदिवे यांनी आपले पत्रकार यांना सांगीतले

# स्वेरीत 'अॅडव्हान्सड इंडस्ट्रियल ऑटोमेशन अँड कंट्रोल'यावर कार्यशाळा






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागामध्ये नुकतीच 'अॅडव्हान्सड इंडस्ट्रियल ऑटोमेशन अँड कंट्रोल' या विषयावरील कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत एकूण ७९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यशाळेत प्रशिक्षणार्थ्यांना 'इंडवेल ऑटोमेशन, मंगरूळ' चे ट्रेनर हिमांशु कुमार यांचे मार्गदर्शन लाभले.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. डी. ए. तंबोळी यांच्या नेतृत्वाखाली आयोजिलेल्या या कार्यशाळेचे उदघाटन प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा. एस. एम. खोमने यांच्या हस्ते करण्यात आले. पाहुण्यांचे स्वागत प्रा.आर.एन. खांडेभरड यांनी केले. शैक्षणिक इन्चार्ज डॉ. एम. पी. ठाकरे यांनी यावेळी इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाची अद्ययावत माहिती दिली. विद्यार्थ्यांसाठी अशा कार्यशाळा का राबवल्या जातात, याचे महत्त्व काय? याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रा. खोमणे यांनी 'करिअर करताना अशा पद्धतीच्या कोर्सचा भविष्यात कसा उपयोग होतो यावर विचार प्रकट केले. कार्यशाळेचे ट्रेनर हिमांशू कुमार यांनी सदरचे सहा दिवसीय प्रशिक्षण हे कशा पद्धतीचे असेल याविषयी माहिती दिली. प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी ऑटोमेशन, कंट्रोलर व पीएलसी विषयी माहिती दिली तसेच लँडर डायग्राम, बेसिक प्रोग्रॅमिंग ट्रीक टाईम बेस्ड उदाहरणे, कोडसेस सॉफ्टवेअर मधील प्रोग्रॅमचा सराव करून घेतला. प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी पल्स इन्स्ट्रक्शन पल्स व काउंटरवरील उदाहरणे, प्रोग्रॅमिंग इन जीएक्स डेव्हलपर्स, ऑनलाइन एडिट प्रोजेक्टर डेव्हलपमेंट याविषयी अधिक माहिती दिली. तिसऱ्या दिवशी 'इंट्रोडक्शन टू डिजिटल इनपुट/ आउटपुट वायरिंग कन्सेप्ट, पीएलसी हार्डवेअर व सॉफ्टवेअर, कम्युनिकेशन, प्रोग्रॅम अपलोड व डाउनलोड याविषयी सांगितले. चौथ्या दिवशी इंट्रोडक्शन टू ह्युमन मशिन इंटरफेस स्क्रीन डेव्हलपमेंट, टॅग क्रिएशन, प्रोजेक्ट डेव्हलपमेंट याविषयी माहिती सांगितली. पाचव्या दिवशी 'एसीड्राईव्ह, स्पीड डायरेक्शन, अनॉलॉग सिस्टीमचे इंट्रोडक्शन, याविषयी सांगितले. सहाव्या दिवशी 'एक्सलरेशन अँड डी-एक्सेलरेशन टाईम कंट्रोल ऑफ इंडक्शन मोटर, वूईथ पी एल सी, ब्लॉक डायग्राम ऑफ एडीसी अँड डीएसी एप्लीकेशन, रियल टाइम एप्लीकेशन, एस सी ए डी ए मॉनिटरिंग अँड कंट्रोल' याविषयी उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

अखेर या कार्यशाळेमध्ये उपस्थित झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना पाहुण्यांचे हस्ते प्रमाणपत्र देऊन कोर्सची सांगता करण्यात आली. यावेळी प्रा. डी.डी. डफळे, प्रा. व्ही.ए.सावंत यांच्यासह इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातील प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.




# निफाड येथे महापरिनिर्वाण दिनी रक्तदान करून श्रद्धांजली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : माणसाला माणूस म्हणून जगता याव यासाठी अखंड आयुष्यभर मानव मुक्तीचा लढा लढणारे महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने निफाड येथे ब्लड फॉर बाबासाहेब या अभियानांतर्गत रक्तदान करून अनोखी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.देशातील २० राज्यांमध्ये व जगभरातील पाच देशांमध्ये एकाच वेळी होत असलेल्या रक्तदान उपक्रमांतर्गत निफाड शहर व तालुक्यातील समाज बांधवांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवून रक्तदान केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरामध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये तरुणांची उपस्थिती लाक्षणिक होती. सदर रक्तदानामध्ये ५६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. असुन या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल समाधानही व्यक्त केले.सदर उपक्रमासाठी मालेगाव शासकीय रुग्णालयाच्या डॉ. अंकिता पवार व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले सदर रक्त संकलन हे शासकीय रक्तपेढीत जमा केल्यामुळे गरजू व गोरगरिबांना रक्त विनामूल्य उपलब्ध होईल व त्यांना मदत होईल असा मानस आयोजकांनी व्यक्त केला.

या मध्ये धनंजय कुंदे प्रथमेश खडताळे, सुहास सुरळीकरराजेश लोखंडे, विकास खडताळे, प्रवीण खडताळे, सचिन निकाळे सचिन निकाळे, राकेश निकाळे, सागर साळवे, अभिजित सुरळीकर, सुनील साळवे, मच्छिंद्र ढेंगळे, आकाश जगताप, हर्षल जगताप, अल्ताब पठाण, फारुक तांबोळी, अभय खडताळे, संतोष ढेगळे, छगन कटारे, राजदीप साळवे, रोशन सोनवणे, अनिकेत साळवे, अमित निरभवणे, रावसाहेब नत्थु कांबळे, पंकज जगताप, ऋषिकेश साळवे, अनुराग खडताळे, महेंद्र कटारे, योगेश गवळी, विशाल जाधव, प्रतीक खडताळे, अजय खडताळे, कृष्णा गोळे, समाधान निरभवणे, किरण केदारे, नवनाथ पवार, कुणाल खडताळे, राहुल नागरे, नंदू आहीरे,निखिल रायते, विकास आहिरे, आदेश खडताळे, युवराज मोरे, खंडू निरभवणेदीपक कांबळे, ज्ञानेश्वर खडताळे, प्रणव पगारे, स्वप्नील आहिरे, सिद्धार्र गजभीये निलेश आहिरे, अनुराग खडताळे, आकाश खडताळे दुर्योधन गांगुर्डे, प्रतीक पगारे,सचिन खडताळे या रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या अभियानाच्या यशस्वीतेसाठी सुहास सुरळीकर, सचिन खडताळे, राजेश लोखंडे, प्रतीक पगारे राकेश निकाळे, प्रथमेश खडताळे, विकास खडताळे, शुभम पगारे यासह डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# चैत्यभूमी येथे आलेल्या अनुयायांना वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ भारतीय संविधान व बुद्ध धम्म ग्रंथ पुस्तकांची मोफत वाटप




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त,या ज्ञानाच्या अथांग महासागरास अभिवादन करण्यासाठी लाखो अनुयायी चैत्यभूमी दादर येथे जमतात.

आणि चैत्यभूमी येथे आलेला प्रत्येक अनुयायी पुस्तकांची खरेदी करून महामानवाला आदरांजली वाहत असतो.मनुष्याला जर स्वतःची उन्नती करून घ्यायची असेल तर वाचन आणि ज्ञानार्जन करावे हे महामानवाचे विचार होते.त्याच विचारांचा वारसा डोळ्यासमोर ठेवून,संविधाना प्रति जागरूकता व बुद्ध धम्माचा प्रसार व्हावा या अनुषंगाने,कालकथित आनंद काशिनाथ तायडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मोफत संविधान,बुद्ध आणि त्याचा धम्म व संविधान प्रास्ताविका आणि भोजनदान या कार्यमक्रमाचे आयोजन कालकथित आनंद तायडे यांचे जेष्ठ चिरंजीव द पीपल बहुद्देशीय संस्थेचे मुंबई महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष डॉ अमरकुमार आनंद तायडे व टीम यांच्या वतीने करण्यात आले होते.

सकाळी बुध्द वंदना घेऊन बारा ते सहा या दरम्यान आरोग्य शिबीर डॉ. उल्हास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

त्यानंतर सहा ते नऊ वेळेत भारतीय संविधान व बुद्ध धम्म यावर आधारती प्रश्नमंजुषा व मोफत ग्रंथ वितरणात संविधान या ग्रंथाच्या शंभर हुन अधिक प्रति व बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाच्या चारशे च्या जवळपास प्रति वितरित करण्यात आल्या.

रात्री नऊ ते बारा या दरम्यान हजारो अनुयायांना भोजन दान करण्यात आले. डॉ अमरकुमार तायडे व त्यांची टीम संपूर्ण महाराष्ट्रात संविधान बद्दल जागरूकता निर्माण व्हावी यासाठी निशुल्क संविधान वाटप करत असते.यावेळी भवन्तु सब्ब मंगलम बहुउद्देशीय संस्था याचे मोलाचे सहकार्य लाभले याप्रसंगी अतिषभाई खराटे, निलेश अहिरे भिमराव मोरे, तेजस धुमाळे,धनराज तायडे, अजय कांबळे हजर होते तर द पीपल्स बहुउद्देशीय संस्था मुबंई महाराष्ट्रचे, प्रमोद तायडे, करण झनके, आर्दश सुरडकर, गजानन मोरे, संदेश प्रधान, निशातभाई ठाकरे,आशिष पवार, सतिष साळवे, मिलींद साळवे, तुषार मोरे यांनी नियोजन बघितले.

# जिल्हा सहकारी बँकांचा सहकार क्षेत्रात आदर्श: बळीराजा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी ताकद!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहील्यानगर/प्रतिनिधी : राज्यातील सहकार क्षेत्राने अनेक दशकांपासून बळीराजाला आधार दिला असून, जिल्हा सहकारी बँकांनी या क्षेत्राला वेगळा आदर्श निर्माण करून दिला आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सहकार सोसायटींच्या माध्यमातून कर्जवाटप करत, त्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यात या बँकांचा मोलाचा वाटा आहे. या माध्यमातून शेतकरी सक्षम होऊन ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक मजबूत होत आहे.

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा आदर्श कारभार,

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने बळीराजा, व्यापारी वर्ग, सेवानिवृत्त कर्मचारी, बीडी कामगार, आणि छोट्या उद्योजकांसाठी कर्जपुरवठा व ठेवींचे संरक्षण करत आर्थिक स्थैर्य निर्माण केले आहे. ग्रामीण भागातील पतसंस्था चळवळीत पारनेर व अकोले तालुक्यातील ठेविदारांचा आजही बँकेवरील विश्वास अबाधित आहे. जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये सहकार चळवळ विस्तारली असून मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांची जाळीही मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे.

जिल्हा निबंधकांचे वेळोवेळी योग्य मार्गदर्शन आणि बँकेच्या पारदर्शक कारभारामुळे या सहकारी संस्थांनी ठेवीदारांचा विश्वास संपादन करत राज्यभर आदर्श प्रस्थापित केला आहे.

सहकार क्षेत्रातील अग्रगण्य संस्था: कार्यकारी संचालक रावसाहेब वर्पेंचा सन्मान, आशिया खंडातील सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्यकारी संचालक रावसाहेब वर्पे यांनी काल दैनिक समर्थ गावकरी व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा सन्मान करण्यात आला.

दैनिक समर्थ गावकरी समूह आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने त्यांना साल, पुष्पगुच्छ, व साईबाबांची मूर्ती देऊन गौरविण्यात आले. यावेळी उपस्थित असलेल्यांमध्ये महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गावकरीचे संपादक डॉ. विश्वास आरोटे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि प्रगतशील शेतकरी शिवाजीराव नाईकवाडी (मामा), अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे गुणवंत अधिकारी भारत वाकचौरे, भारतीय जनता पक्षाचे प्रांतिक सदस्य आणि मुळा परिसरातील प्रगतशील शेतकरी राम तळेकर हे मान्यवर उपस्थित होते.

जिल्हा सहकारी बँकांची भूमिका आणि भविष्य, जिल्हा सहकारी बँकांनी ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला उभारी देण्याबरोबरच सहकार चळवळीत नवा आदर्श निर्माण केला आहे. बळीराजा, व्यापारी वर्ग आणि सर्वसामान्यांसाठी कार्यरत राहून या बँका केवळ आर्थिक सेवा देत नाहीत, तर सामाजिक उत्तरदायित्वाचीही पूर्तता करत आहेत. त्यामुळे या सहकारी संस्थांचा आदर्श राज्यातील इतर संस्थांसाठी मार्गदर्शक ठरत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश वाघ यांचा अपहरण करून खून

पुणे : हडपसर येथील भाजपचे नेते विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश सातबा वाघ यांचे फुरसुंगी फाटा येथून सोमवारी सकाळी पहाटेच्या सुमारास अपहरण केल्याची घटना घडली होती. या प्रकरणाचा तपास सुरू असताना,पुणे शहरापासून जवळपास ४५ किलो मीटर अंतर असलेल्या यवत पोलिस स्टेशनच्या हद्दीत सतीश वाघ यांचा मृतदेह आढळला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,सोमवारी सकाळी साडे सहा वाजण्याच्या सुमारास सतीश वाघ हे घरातून फिरायला बाहेर पडले होते. त्यावेळी मोटारीतून आलेल्या चार ते पाच जणांनी सतीश वाघ यांना धमकावून सासवडच्या रस्त्याने पसार झाले. तर एकाने ही घटना पाहिली आणि त्यानंतर पोलिसांकडे तक्रार देण्यात आली.या घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी पथके तयार करून विविध ठिकाणी रवाना करण्यात आली.मात्र पुण्यापासून ४५ किलोमीटर अंतरावरील यवत पोलिस स्टेशनच्या हद्दीत सतीश वाघ यांचा मृतदेह आढळून आला आहे.

# दूध आंदोलन पेटणार

## मागण्या मान्य न केल्यास १६ डिसेंबरला काढणार मोर्चा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/ राहुल साबळे

गेल्या अनेक दिवसापासून दुग्ध व्यवसाय हा पूर्णपणे तोट्यामध्ये असून बंद पडण्याच्या अवस्थेमध्ये आला आहे. त्यामुळे राज्य सरकारने शेतीला जोडधंदा म्हणून ज्या काही योजना राबविल्या जातात त्यातली हा मुख्य दूध व्यवसाय असून हा दूध व्यवसाय आज रोजी प्रायव्हेट दूध संघ दूध खरेदी करत असल्यामुळे तीन पाच आठ पाच ला प्रति लिटर २५ रुपये भाव मिळत असल्यामुळे शेतकऱ्याचे झालेले खर्च सुद्धा वसूल होत नाही त्यामुळे शेतकरी त्रस्त आहे आता नवीन शेतकऱ्याचं सरकार आलं असल्याने शेतकऱ्याची मागणी आहे तीन पाच आठ पाच ला प्रति लिटर ३५ रुपये भाव द्या तुमच्या कुठल्याही योजना आम्हाला नकोय फक्त आमच्या मालाला हमीभाव द्या आणि शासन स्तरावर शासकीय दुध डेऱ्या चालू करून शेतकऱ्यांचा दूध खरेदी करा म्हणजे शेतकऱ्याला हमीभाव मिळेल आणि शेतीला जोड धंदा हा चांगला राहील आणि गाय म्हैस या जनावराला शासन स्तरावर शंभर टक्के अनुदानावर इन्शुरन्स विमा काढण्यात यावा आणि जनावरांना लागणारा ढेप आणि सुग्रास यासारखे खाद्याला ८० टक्के सबसिडी मिळावी. त्यामुळे ही मागणी आज उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे करण्यात आली.

**येणाऱ्या १५ तारखेपर्यंत जर मागणी पूर्ण झाली नाही तर १६ तारखेला उपविभागीय कार्यालय सिंदखेडराजा येथे भव्य दूध आंदोलन मोर्चा काढण्यात येईल असा इशारा शेतकरी योद्धा कृती समितीने दिला आहे त्यावेळी श्री बालाजी सोसे छगन माने ज्ञानेश्वर मुळे गजानन लबडे सुदाम राऊत संदीप राऊत प्रवीण माने अमोल वाघमारे यावेळी निवेदन देताना शेतकरी उपस्थित होते. म्हणून या आंदोलनामध्ये तमाम दूध शेतकऱ्यांनी सामील व्हा असे आव्हान सुद्धा या ठिकाणी करण्यात आले.**

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय पुरस्काराने पत्रकार प्रताप मोरे होणार सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/ राहुल साबळे : गेल्या ३० वर्षा पासून दैनिक देशोन्नती मध्ये निर्भीड व शोध उत्कृष्ट पत्रकारिता उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट वृत्तकथा, उत्कृष्ट समाज कार्य करणारे पत्रकार प्रताप मोरे यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकारिता राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण येत्या ३० डिसेंबर रोजी सा खेर्डा येथे होणार असल्याने परिसरात त्यांच्यावर आनंदाचा वर्षाव होत आहे.

प्रसिद्धी पत्रकानव्ये कळविण्यात आले की, दै. भारत संग्राम व स्व. मधुकर खंडारे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ व सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त तसेच समाजभूषण अर्जुन गवई यांच्या वाढदिवसानिमित्त साखरखेर्डा येथे राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. त्यामध्ये उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट वृत्तकथा, उत्कृष्ट समाज कार्य स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृती लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या पुरस्कारांसाठी पत्रकारांची मागील ३० वर्षांची कामगिरी, त्यांची सामाजिक बांधिलकी, शासनाच्या विकासविषयक प्रसिध्दीसाठी, जनतेमधील विकासविषयक जाणिवांच्या जागृतीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न आणि आज पर्यत त्यांची कामगिरी हे पाहुण दैनिक देशोन्नती मध्ये सतत ३० उत्कृष्ट काम करणारे प्रताप मोरे यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकारिता राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात येत आहे. हा राज्यस्तरीय पुरस्कार येत्या ३० डिसेंबर रोजी सा खेर्डा येथे मान्यवराच्या हस्ते बहाल करण्यात येणार असल्याचे समाज भूषण अर्जुन गवई तथा दै. भारत संग्राम चे जिल्हा प्रतिनिधी सचिन खंडारे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.




# शेतकऱ्याच्या मुलाचा आवाज विधानसभेत घुमला!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार अभिजीत पाटील यांनी विधान भवनामध्ये शपथ घेतली. एका शेतकऱ्याच्या मुलाचा आवाज विधानसभेत घुमला, असे सर्वत्र चर्चिले जात होते.

माढा विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार अभिजीत पाटील यांनी रविवार दिनांक ८ रोजी विधानभवनामध्ये आमदारांचा शपथविधी सोहळा झाला त्यावेळी शपथ घेताना त्यांनी माळ्याचे ग्रामदैवत माढेश्वरी व पंढरीचा पांडुरंगाची शपथ घेऊन महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री छत्रपती, शिवाजी महाराज, भारतरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व सर्व महापुरुषांना वंदन करून भारत मातेला ही वंदन केले. या पुढील काळातही माझ्या हातून जनहिताची कामे घडावीत, सदैव प्रयत्नशील राहील, असे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

## कर्मयोगी इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी लोणारे

अंतर्गत अंतर महाविद्यालयातील रायफल दोन पिस्टल शूटिंग या विभागीय क्रीडा योजनेमध्ये श्री पांडुरंग प्रतिष्ठान संबंधित कर्मवीर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अभियांत्रिकी महाविद्यालय शेळवे तालुका पंढरपूर येथील विद्यार्थिनींनी गवळीत यश संपादित केले आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी लोणारे या कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये रायफल शूटिंग विभागावरील स्पर्धेमध्ये कर्मवीर विद्यार्थी खटावकर व आदित्य सदिवाली यांनी पिस्टल शूटिंग मध्ये प्रथम क्रमांक तर रायफल शूटिंग मध्ये प्रतीक्षा कोपनर आणि द्वितीय तर वैष्णवी तांबे येणे तृतीय क्रमांक पटकावला.




सदरच्या स्पर्धेत वर्धमान शूटिंग क्लब पिलीव येते आयोजित करण्यात आले होते यामध्ये महाराष्ट्रातून सुमारे २४ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता वरील क्रीडा स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्राध्यापक गणेश बागल यांच्या विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन मिळाले वारेमान शूटिंग क्लबच्या आकाश गोजरे यांनी पंच म्हणून काम पाहिले.

श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त श्री रोहन परिचारक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील कर्मवीर इन्स्टिट्यूट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ए बी कणसे रजिस्टर श्री जेडी वाळके उपप्राचार्य प्राध्यापक जी एल मुंडेगावकर संशोधन अधिष्ठाता डॉक्टर अभय उत्पाद शैक्षणिक अधिष्ठाता प्राध्यापक आशिष जोशी विभाग प्रमुख प्राध्यापक डॉक्टर एस व्ही प्राध्यापक अनिल बाबर प्राध्यापक सोमनाथ तांबे प्राध्यापक दीपक भोसले प्राध्यापक अभिनंदन देशमाने शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख श्री गणेश बागल तसेच सर्व प्राध्यापक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## एस.पी. अतुल कुलकर्णी यांचे महाराष्ट्र लोकविकास मंचकडून कौतुक

धाराशिव/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील दाबा गावच्या ऊसतोड कामगारांना लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील मुकादम तुळशीराम गायकवाड यांनी उत्तर सोलापूर मध्ये सोलापूर तुळजापूर रोडपासून आत असलेल्या उळे गावं ठरवड ऐकूर्ग गावाच्या बाजूला धरनातं तुळशीराम गायकवाड या गुत्तेदाराने ऊसतोड कामगाराना बंदिस्त केल्याचा निरोप महाराष्ट्र लोक विकास मंचचे राष्ट्रीय अध्यक्ष विश्वनाथ तोडकर यांना लागला. त्यांच्याकडून तातडीने भूमिपुत्र वाघ यांना या संदर्भात कार्यवाही करण्यासाठी माहिती देण्यात आली.वाघ यानी या संदर्भातिल माहिती मिळाल्यावरून, एसपी अतुल कुलकर्णी यांना फोन करून माहिती देऊन विनंती करण्यात आली. सोबत संबंधित पोलीस स्टेशनला अतुल कुलकर्णी यांनी निरोप दिला. संबंधित पोलीस स्टेशनचे पीएसआय,राहुल देशपांडे, एपीएम माने साहेब यांनी तातडीने कार्यवाही केली. बंदिस्त करून ठेवलेल्या ऊसतोड कामगारांना मुक्त केले.सोबत छत्रपती संभाजी नगरच्या कॉन्स्टेबल पार्वती (राणी)भोसले यांचीही हे कार्यवाही करण्यासाठी आणि संपर्क करण्यासाठी मदत झाली.तेव्हा वरील सर्व अधिकारी आणि पोलीस प्रशासनातील सर्व कर्मचाऱ्यांचे महाराष्ट्र लोक विकास मंचचे राष्ट्रीय अध्यक्ष विश्वनाथ तोडकर (अण्णा )भूमिपुत्र वाघ, यांचे कडून कौतुक होत आहे.

## एक गाव एक गणपती आणि गणराया पुरस्काराने गणपती मंडळाचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये एक गाव एक गणपती संकल्पना राबवून गणेश मंडळांनी एकीचे दर्शन घडवली त्याचबरोबर ज्या गणपती मंडळांनी पारंपारिक वाढण्याचा वापर करत पूर्वापर चालत आलेली संस्कार जपले अशा मंडळांना तालुका पोलीस स्टेशनचे गणराया सन्मानाने गौरवण्यात आले.



पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथील उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गणेशोत्सवाच्या गावातील गणेश मंडळी पदाधिकाऱ्यांनी एक गाव एक गणपती संकल्पना प्रत्यक्षात राहून एक गाव एक गणपती स्थापन केले अशा गावातील गणेश मंडळाचे पदाधिकाऱ्यांना तसेच पारंपारिक वाद्याचा वापर केलेल्या गणेश मंडळांना प्रथम क्रमांक द्वितीय क्रमांक तृतीय क्रमांक ची निवड करून गणराया पुरस्काराने यथोचित सन्मानित करण्यात आले.

हे पुरस्कार उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अजून भोसले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला यावेळी तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर व पोलीस कर्मचारी तसेच कार्यक्रमासाठी सर्व गणेश मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्यापारी महासंघाच्या अध्यक्षपदी सतीश पुदाले यांची तर सचिवपदी संतोष मुळे यांची एकमताने निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/प्रतिनिधी : कन्फडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड अँग्रिकल्चर मराठवाडा विभागीय अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक धाराशिव येथे पार पडली बैठकीमध्ये धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव यांनी ऐतिहासिक नळदुर्ग शहराच्या व्यापारी महासंघ अध्यक्षपदी सतीश अशोकराव पुदाले यांची तर सचिवपदी संतोष मुळे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.



सतीश पुदाले यांच्या वडीलो पार्जित व्यापारी मंडळाचे काम पाहात आले आहेत शिवाय सतिश पुदाले हे शालेय जीवनात यशस्वी होण्यासाठी स्वतःमध्ये बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न केला व तसेच महाविद्यालयीन जिवनात १९९८ – ९९ ला विद्यापीठ प्रतिनिधी यू आर म्हणून काम केले आहे त्याच बरोबर विद्यार्थीसाठी खुप चांगल्या पद्धतीने विद्यार्थांची कामे करत आसत गरीब विद्यार्थांना मदतीचा हात पुढे करून त्यांना शैक्षणिक दृष्टीकोण सरळ ठेवुन शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे, सामाजिकदृष्ट्या जिवनात शिवम कॉम्प्युटर सेंटर च्या वतीने गरीब होतकरू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे व त्यांना शालेयपयोगी वस्तुचे वाटप करणे हा ध्यास मनाशी बाळगून ते आज तागायत काय करत आहे त्यामुळे सर्व गोष्टीचा विचार करून सतीश अशोकराव पुदाले यांची ही सार्थ निवड करण्यात आली आहे शिवाय सचिवपदी संतोष मुळे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे यावेळी नळदुर्ग येथील व्यापारी महासंघाचे मुकुंद नाईक, सुभाष कोरे , विशाल डुकरे सह अनेक कार्यकर्ते व्यापारी महासंघाचे सदस्य उपस्थित होते

**ईव्हीएम'ची घोड्यावरुन मिरवणूक!** मशीनच्या समर्थनात तरंगवाडी मैदानात

# मारकडवाडीला उत्तर तरंगवाडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी: अतुल सोनकांबळे

'ईव्हीएम'ची घोड्यावरुन मिरवणूक! मशीनच्या समर्थनात तरंगवाडी मैदानात सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी येथील ग्रामस्थांनी ईव्हीएमवरील मतदानाला विरोध करत बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी केली होती. त्यानुरूप चाचणी मतदान घेण्याचे नियोजन केले होते. मात्र याला प्रशासनाने विरोध केला. त्यानंतर महाविकास आघाडीकडून हा मुद्दा राज्यभर उचलण्यात आला.




विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात ईव्हीएम विरोधात महाविकास आघाडीचे जोरदार निषेध आंदोलने सुरू असताना इंदापूर तालुक्यातील तरंगवाडी मध्ये मात्र ईव्हीएम च्या समर्थनात तरंगवाडी मैदानात अशी जोरदार घोषणाबाजी करत डीजेच्या तालावर प्रतिकात्मक ईव्हीएम ची घोड्यावरून मिरवणूक काढली.

माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी येथे ईव्हीएम ला विरोध...तर इंदापूर तालुक्यातील तरंगवाडी गावात ईव्हीएम च्या समर्थनात प्रतिकात्मक ईव्हीएम ची घोड्यावरून डिजेच्या तालावर गावात पुष्पवृष्टी करून रॅली काढण्यात आली.

## डुबेरे जनता विद्यालयात मिनी मॅरेथॉन स्पर्धा संपन्न




सिन्नर/प्रतिनिधी : नाशिक जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार तथा डुबेरे येथील भूमिपुत्र राजाभाऊ वाजे तसेच श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन तथा राज्य पतसंस्था फेडरेशनचे कार्याध्यक्ष नारायणशेठ वाजे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च विद्यालयात मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. एन.के. फाउंडेशन अध्यक्ष गणेश वाजे यांच्या संकल्पनेतून वाढदिवसानिमित्ताने दरवर्षी विद्यालयात मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यावेळी बोलताना विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे म्हणाले की, खेळातून विद्यार्थ्यांचा शारीरिक व मानसिक विकास होतो. म्हणून खेळांची विद्यार्थ्यांना गरज आहे. स्पर्धेचे उद्घाटन शालेय समितीचे सदस्य भाऊ वारुंगसे,प्रा. दत्तात्रय जाधव, मुख्याध्यापक रामदास वाजे व पोलीसपाटील रामदास वारुंगसे आदींच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. विद्यालयातील चारशे विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्स्फूर्तपणे प्रतिसाद नोंदविला. इयत्ता पाचवी ते सातवी लहान गट व इयत्ता आठवी ते दहावी मोठा गट या दोन गटात स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.इयत्ता पाचवी ते सातवीच्या मुलांसाठी तीन किलोमीटर अंतर तर इयत्ता आठवी ते दहावी मुलांच्या स्पर्धेसाठी पाच किलोमीटर अंतराची अट ठेवण्यात आली होती.तसेच इयत्ता पाचवी ते दहावीच्या मुलींसाठी तीन किलोमीटर अंतराची अट ठेवण्यात आली होती. प्रत्येक गटातून पाच अशा वीस यशस्वी विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यशस्वी विद्यार्थ्यांना लवकरच पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे. क्रीडा शिक्षक शिवाजी गुरुळे यांनी स्पर्धेचे नियोजन व आयोजन केले केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक रामदास वाजे, शिक्षक डी. एच.जाधव, सोमनाथ गिरी मारुती डगळे, अरुण डावरे, सीमा गोसावी,जयश्री गोहाड, कचेश्वर शिंदे,अलका काळोगे, विद्या ठाकरे, कल्पना शिंदे, राजेंद्र गांगुर्डे, किशोर शिंदे, रवि गोजरे, ज्ञानेश्वर कडभाने, ऋषिकेश कुंदे ,निवृत्ती बर्गे आदींसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात...

### संत रविदास महाराज हे १५ व्या शतकातील एक महान संत



पुरंदर : पुरंदर :ज्यांनी भारतीय समाजातील भेदभाव आणि अन्यायाच्या विरोधात आ-पले जीवन समर्पित केले. ते हिंदू धर्मातील संत होते, परंतु त्यांनी सर्व धर्म, जा ती आणि समुदायांतील लोकांना समानता, प्रेम आणि आदर्श जीवन जगण्याचा संदेश दिला.

रविदास महाराज यांचा मुख्य उपदेश होता - भगवान एकच आहे आणि सभी मनुष्य समान आहेत. त्यांनी आपल्या भक्ति काव्यांद्वारे जातिवाद, अस्पृश्यता आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात संघर्ष केला. त्यांचे राम का नाम लिया करो आणि मनो गंगा जी जैसी भावना असे गोड गीत प्रसिद्ध आहे. त्यांनी प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणात देवतेच्या अस्तित्वाची महत्त्वता सांगितली आणि सर्वांना आत्मसाक्षात्काराची प्रेरणा दिली. रविदास महाराज यांचे कार्य आजही लाखो लोकांना प्रेरणा देत आहे, आणि त्यांच्या शिकवणीमुळे समाजात प्रेम, समानता आणि एकतेचा संदेश पसरला आहे.

# आमदारकीच्या विजयोत्सवात जिल्हा परिषद निवडणूकीची साखर पेरणी?

## आ. अभिजीत पाटील यांचा विजयोत्सव भोसे गावात पेढे वाटून साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी) : अभिजीत पाटील हे जितके निवडणुकीसाठी कायम तयारीत असतात , तितकीच तयारी त्यांच्या भोसे येथील कार्यकर्त्यांनी दाखवली आहे. आ. अभिजीत पाटील यांच्या विजयाचा गुलाल उधळीत, सबंध गावकऱ्यांना पेढे वाटून , जिल्हा परिषद निवडणुकीची साखर पेरणी केल्याचे दिसत आहे. येथील भारत बापू कोरके या नागरिकाने, सबंध गावकऱ्यांना पेढे वाटून, मोठे गुढ निर्माण केले आहे.

भारत वैजनाथ कोरके हे एक गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर असून, सद्गुरु कन्स्ट्रक्शन या ना-वाने त्यांचे फर्म आहे. त्यांचे वडील कै. वैजनाथ कोरके हे पंढरपूर बाजार समितीचे सदस्य होते.

आई कै. कलावती वैजनाथ कोरके यांनी जिल्हा परिषद सदस्यपद भूषवले हो-ते. राजकीय पार्श्वभूमी असणारा हा युवक




नवनिर्वाचित आ. अभिजीत पाटील यांचा कार्यकर्ता आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी अभिजीत पाटील यांचा झेंडा खंबीरपणे पेलला होता. मागील काही वर्षापासून ते येथील जिल्हा परिषद निवडणुकीसाठी इच्छुक आहेत.

माढा विधानसभा मतदारसंघात अभिजीत पाटील यांची निवड होताच, भोसे गावात भव्य मिरवणूक संपन्न झाली. या मिरवणुकीतही हा शिलेदार मोठ्या हिरिरीने सहभागी होता.

आ. अभिजीत पाटील यांनी भोसे गावात समर्थकांची मोठी फळी निर्माण केली आहे. सुमारे साडेसहा हजार मतदान असणाऱ्या या गावातून , जास्त मते घेणारा उमेदवारच आजवर जिल्हा परिषद निवडणुकीत विजयी झाला आहे.

होऊ घातलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीचे वारे आमदारकी पाठोपाठ वाहू लागले आहे. नूतन आ .अभिजीत पाटील यांचा मोठा प्रभाव या निवडणुकीवर रा-हणार आहे.

अभिजीत पाटील यांनी आमदारकीची निवडणूक जिंकताच, भारत बापू कोरके यांनी सबंध गावकऱ्यांना पेढे वाटप केले. सुदैवाने या निवडणुकीत अभिजीत पाटील यांना या गावातून ५८१ मतांची आघाडी मिळाली आहे. ही आघाडी टिकवून ठेवण्याचे काम आ.अभिजीत पाटील यांच्या भोसे येथील शिलेदारांना करावे लागणार आहे. त्यातीलच एक भाग हा पेढे वाटपाचा कार्यक्रम होता ,अशी चर्चा येथील ग्रामस्थांमधून होऊ लागली आहे.

**पंढरपूर तालुक्यात भोसे जिल्हा परिषद गट आहे. या गटावर कायमच विठ्ठल परिवाराचे वर्चस्व राहिले आहे. आ. अभिजीत पाटील यांची सत्ता विठ्ठल कारखान्यावर आली. आणि येथूनच या गटाचे राजकारण बदलून गेले. कधी काळी विरोधक न सापडणाऱ्या या गटात, आज अभिजीत पाटील गटाचे अनेक कार्यकर्ते निवडणुकीसाठी दंड थोपटून तयार आहेत.**

# राजाभाऊ सरवदे यांना महायुतीच्या कोट्यातून मंत्री करा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/ तालुका प्रतिनिधी : राज्यात नव्याने स्थापन झालेल्या महायुती सरकारच्या कोट्यातून रिपाई (आठवले) गटाचे प्रदेश अध्यक्ष मा.राजाभाऊ सरवदे यांना मंत्री मंडळात मंत्री किंवा महामंडळाचे अध्यक्ष करण्यात यावे अशी मागणी रिपाईंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.डॉ.रामदासजी आठवले यांच्या कडे अक्कलकोट ता अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी मुंबई येथे सदिच्छा भेट घेऊन केली आहे.

२०१४ पासून लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत महायुती सोबत रिपाईने खांद्याला खांदा लावून सत्ता आणण्यासाठी जिवाचे रान केले आहे. २०१४ साली देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमध्ये महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणून सव्वा वर्ष इतका कमी कालावधी भेटला होता. या कालावधीत राज्यातील दलित मागासवर्गीय बांधवांना एक लाख ते पाच लाखापर्यंत थेट कर्जाचे वाटप करुन बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचे काम महामंडळाच्या

**केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्याकडे अक्कलकोट रिपाइंची मागणी**

वतीने महायुती सरकारच्या वतीने केले आहे. राज्यातील उपेक्षितांना, बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पुन्हा एकदा मंत्री किंवा महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ देऊन रिपाईंचा उचित सन्मान करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन रिपाईचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे व सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी आठवले यांच्या कडे केले आहे.यावेळी दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी,आंदेवाडीचे सरपंच रमेश धोडमनी,आदी सह मुंबई येथील सिद्राम ओहळ ता.अध्यक्ष सिध्दुभाऊ कांबळे आदी उपस्थित होते.

# अक्कलकोट येथे श्वान मृत्यु प्रकरणी कॅंडल मार्च

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट शहर.शेकडो. श्वा नांच मुत्यु विषबाधेतून झाले आहे असा संशय व्यक्त.करीत.. शनिवारी सायंकाळी अक्कलकोट शहरातून शेकडो प्राणिमित्रांनी. एकत्र येत. कँडल मार्च. काढण्यात आला. त्याप्रसंगी दोषीवर. कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आला.

राज्य श्वान संघटना प्राणिमित्र यांच्या नेतृत्वा खाली अक्कलकोट मल्लिकार्जुन मंदिर पासून ते प्रमुख मार्गावरून निषेध कँडल माचो काढण्यात आला. यावेळी रोशन पाठक . दिव्य वर्मा . अतिशकाटारे .. महेश धांगडे . अनु प्रीती . तसेच मंजुषा . पंचवाडकर . समर्थ हत्ते . प्रणिता जिदे . प्रशांत केसकर . सिद्धाराम.गुब्या अॅड . राकेश मुका रोहित कुमार . सुचित्रा गडद . रा केश कानडे . श्रीकांत किपरे . अविराज सिद्धे . राहुल राठोड.समर्थ घाटगे . रोहित मोरे . बबलु जाधव . शिवराज जकापरे . अनिल पाटील . आकाश जमादार रवी माशाल कर . सागर पेरकर .यावेळी.आदि उपस्थित होते . आतिष क टारे . प्राणि मित्र मुंबई . याप्रकारणी. अनक. अनेक वेळी भेट. दिली. अक्कलकोट नगरपालिकेकडून कोणत्याही प्रकारचे.सहकार्य मिळाले नाही. त्यानंतर याबाबत पोलिस अधीक्षकाना भेटून हकिकत सांगितली. असताना चांगले सहकार्य लाभत आहे. अनिकेत ठिकाणच्या. सीसी. टीव्ही कॅमेऱ्याची. तपासणी करण्यात आली आहे.. लवकरच तपास पूर्ण होईल दोषीवर कडक कारवाई होईल अशी आशा आहे आतिश कटारे प्राणिमित्र. याप्रसंगी पाठक प्रशांत प्रशांत. तसेच श्रीकांत झिपरे. अनु प्रीती. मंजुषा पंचवाडकर यांनी मनोगत. व्यक्त .केले तर सूत्रसंचालन नितीन पाटील यांनी केले .




# कल्याणशेट्टी कनिष्ठ महाविद्यालयात आनंद मेळावा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित सुरेखा कल्याणशेट्टी कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात शनिवार दिनांक ७ डिसेंबर २०२४ रोजी आनंद मेळावा उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. सुरुवा-तीला संस्थेचे संचालक मल्लिकार्जुन मसुती यांच्या हस्ते फित कापून आनंद मेळाव्याचा उद्घाटन करण्यात आला.



यात इयत्ता ११ वी व १२ वी मधील विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले खाद्यपदार्थ उदा. कस्टर्ड,दाल-चावल, बटाटे वडे, वडापाव, पाणीपुरी, भेळ, कचोरी, पावभाजी, सँडविच कच्ची दाबेली अशा विविध खाद्यपदार्थांची अतिशय सुंदर अशी मांडणी करून ठेवले होते. तसेच लिंबू शरबत, उसाचा रस, गुळाचा चहा आधी पेय सुद्धा ठेवले हो-ते. या मेळाव्याचा आनंद शिक्षण संकुलातील गिरिजामाता प्राथमिक विद्यालय, सौ सुरेखा कल्याणशेट्टी मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय तसेच शिशु वर्गातील विद्यार्थ्यांनी अतिशय मनमुराद लुटला तसेच आस्वादही घेतला. या मेळाव्यास संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी,संस्थेच्या सीईओ सौ रुपाली शहा, कनिष्ठ महाविद्यालयाच्या विभाग प्रमुख सौ पूनम कोकळगी, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

आनंद मेळावा यशस्वी करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक सलोनी शहा, गुरुशांत हपाळे, प्रा शिल्पा धूमशेट्टी, प्रा शितल टिंगरे, शिवकुमार मठदेवरु, मनीषा शिंदे, शितल फुटाणे, जनाबाई चौधरी आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# माळीनगर येथे कृषी कन्यांकडून शेती विषयक ॲपबाबत माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माळीनगर येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ रा-हुरी संचालित रत्नाई कृषी महाविद्यालय अकलूज यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांसाठी ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम २०२४-२५ अंतर्गत कृषी सल्ला केंद्राने आधुनिक शेतीसाठी मोबाईल प्लिकेशन वापर करण्याचा सल्ला देऊन माहिती देण्यात आली. या प्रात्यक्षिकाच्या उपयोजनासाठी शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचालित रत्नाई कृषी महाविद्यालय प्राचार्य आर जी नलवडे कार्यक्रम समन्वयक प्राध्यापक एस एम एकतपुरे कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक एम एम चंदनकर आणि प्राध्यापक एस व्ही



कल्याणी यांच्या मार्गदर्शनानुसार कृषी कन्या प्रतीक्षा हेंबाडे प्रतीक्षा बनस-ोडे सोनाली गायकवाड कोमलताड जिजाऊ बर्डे स्नेहल तांबोळकर प्राची जाधव प्रणाली यादव यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन केले.

माळीनगर या परिसरात मोबाईलच्या अनुषंगाने शेतकरी वर्गाला कृषिकन्या यांच्याकडून शेतीविषयक सल्ला देण्यात आला ॲग्रो नेटवर्क हे ऑडिट रेट आधारित मोबाईल एप्लीकेशन आहे ज्याद्वारे नोंदणीकृत शेतकरी कृषी संबंधित माहिती असे की हवामान अंदाज बाजार दर कृषी सल्लागार तसेच कृषी संबंधित अपडेट बातम्यांसाठी भाषेतून मिळू शकतात नवीन तंत्रज्ञानाच्या आधारे वेळोवेळी आपलिकेशन अपडेट केले जाऊ शकते असे मार्गदर्शन केले यावेळी कृषी कन्या व माळीनगर येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

**गंडे, दोरे कापून दिला अंधश्रद्धेला फाटा**

**गेल्या १९ वर्षांपासून '२२ प्रतिज्ञा अभियान'चा उपक्रम अखंडीतपणे सुरु**

# २२ प्रतिज्ञा सत्य विज्ञान सामाजिक फाउंडेशनतर्फे डॉ. बाबासाहेबांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

दरवर्षी प्रमाणे यावर्षीही २२ प्रतिज्ञा सत्य विज्ञान सामाजिक फाउंडेशन तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनी २२ प्रतिज्ञा सत्य विज्ञान सामाजिक फाउंडेशन अंतर्गत शिवाजी पार्क मैदान येथे २२ प्रतिज्ञा पत्रकाचे वाटप करून २२ प्रतिज्ञा प्रचार आणि प्रसार माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखे अभिवादन करण्यात आले. तसेच अभिवादन करायला आलेल्या अनुयायांना २२ प्रतिज्ञा समजाऊन सांगून त्यांच्या हातातले, गळ्यातले , पायातले गंडे दोरे, तविद, कडे कापून प्रबोधन करण्यात आले.

'२२ प्रतिज्ञा अभियान' हा उपक्रम गेल्या १९ वर्षांपासून राबवत आ-हेत. तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार प्रत्येकाच्या घराघरात पोहचवण्यासाठी डॉ. बासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञांचे आचरण प्रत्येकाने केले पाहिजे. हातातील गंडे-दोरे कापून डॉ. बाबासाहेबांचे विचार सांगण्याचे काम व अंधश्रद्धा दूर करण्याचे काम २२ प्रतिज्ञा अभियान संपूर्ण टीम करीत आहे. या अभियानातून अंधश्रद्धा दूर होत असून, यातून समाजात परिवर्तन होताना दिसून येत आहे. व बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यास येणाऱ्या नागरिकांना वैज्ञानिक दृष्ट्या सक्षम करणे , त्यांना जागृत करण्याचे काम २२ प्रतिज्ञा अभियान करत आहे.

अंधश्रद्धे पासून मुक्ती, धर्म-ईश्वर-पुजारी गुलामी,शोषण पा-




सून मुक्ति, भारताला वैज्ञानिक दृष्टिकोण- विवेक-विचारवादी बनविने, घर घर बुद्धजयंती-घर घर विज्ञान क्रांती,भारताला मानववादी राष्ट्र बनवीने हा उद्देश आहे. २२ प्रतिज्ञा अभियान म्हणजे भारताला अंधश्रद्धेपासून मुक्त करण्याचा उद्देश आहे. असे २२ प्रतिज्ञा अभियान प्रचारक निवृत्त सह आयकर आयुक्त अरविंद सोनटक्के यांनी बोलतांना सांगितले.

२२ प्रतिज्ञा अभियानाच्या वतीने ५ व ६ डिसेंबर रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनी त्यांना अभिवादन करण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून जनता आली होती. तसेच काही विदेशी पर्यटकांनी स्टॉल वर येऊन त्यांनी विज्ञान आणि बौद्ध धम्म कसा एकमेकांना पूरक आहे हे आम्ही किंवा आमचे प्रचारक कश्या पद्धतीने सांगतात आणि २२ प्रतिज्ञाचे महत्व समजून देतात या बद्दल माहिती त्यांनी जाणून घेतली. २०१० पासून आम्ही स्टॉल वर हा उपक्रम राबवत आहोत आणि त्याचा इम्पॅक्ट आता असा आम्हाला दिसतोय कि या वेळेस नागरिकांमी गंडे ,दोरे घा-तलेच नव्हते, जे काही आम्ही थोडेसे गंडे, दोरे कापले आहेत ते यूपी, बिहार मधून आलेल्या नागरिकांचे आहेत. हा बदल आम्हाला नक्कीच प्रेरणा देणारा आहे. नागरिकांच्या मनातून , डोक्यातून अंधश्रद्धा दूर होत आहे. हे यश आहे आमच्या कामाचे असे मी समजतो. असे २२ प्रतिज्ञा अभियान प्रचारक विनोद पवार यांनी बोलताना सांगितले. तसेच २२ प्रतिज्ञा अभियानासाठी ज्यांनी आर्थिक मदत केली त्या सर्व नागरिकांचे २२ प्रतिज्ञा अभियान टीमकडून आभार व्यक्त करण्यात आले.

**१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपुरच्या दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यावर आपल्या अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा देताना २२ प्रतिज्ञा देखील दिल्या होत्या. त्यांचे स्मरण करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. यावेळी मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील पत्रके, बॅनर्सच्या माध्यमातून तरुणांनी २२ प्रतिज्ञांची माहिती भीम अनुयायांना देण्यात आली. तसेच त्यांच्यासोबत चर्चा करून त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार सांगण्यात आले. त्यांच्या मेंदूतील अंधश्रद्धेचे गंडे, दोरे कापण्याचे आले.**